**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च् शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य पुणे ४११००१**
Web : www.dhepune.gov E-mail : budget.dhepune@nic.in.

फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११९५३

क्र. अर्थस-२०१६ (०३०/१६) लेखा -२ 7150 दि.१३ जून २०१६

प्रति,

शिक्षण संचालनालय ( उच्च शिक्षण ) यांच्या
अधिपत्याखालील सर्व महाविद्यालये / कार्यालये / संस्था.

विषय - सन २०००-०१ ते २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षात खरेदीची विहित माहिती पाठविण्याबाबत

संदर्भ - १.शासन पत क्र संकीर्ण २०१५/ प्र. क्र. १७६/ साशि-१ दि. २३/१२/२०१५

उपरोक्त विषयाबाबत सोबत सादर करण्यात आलेले शासन पत्र क्र संकीर्ण २०१५/ प क्र १७६/ साशि-१ दि.२३/१२/२०१५ चे अवलोकन व्हावे.

याबाबत सादर करण्यात येते की, शासनाच्या विविध विभागाकडून मागील १५ वर्षात झालेल्या खरेदीची चौकशी करणे या संदर्भात मा मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समितीची आढावा बैठक दि २४/११/२०१५ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीचे इतिवृत सोबत सादर करण्यात आलेले आहे.

यामध्ये खरेदी संदर्भात मागील १५ वर्षात दरकरारावर करण्यात आलेल्या खरेदीबाबतची माहिती विवरणत्र अ, ब, क, मध्ये मागविण्यात आलेली आहे. यामध्ये विवरण पत्र अ - रु.५० लक्ष , रु.१० लक्ष , रु.३ लक्ष वरील खरेदी विवरण पत्र ब -रु १० कोटी वरील खरेदी तसेच या खरेदी संदर्भात महालेखापाल कार्यालय, लेखाधिकारी / स्थानिक लेखाधिकारी इ. उपस्थित केलेला लेखा आक्षेप याबाबतची माहिती मागविलेली आहे. तरी सदरची माहिती जोडण्यात आलेल्या विवरणपत्र अ , ब , क मध्ये तात्काळ देण्यात यावी.

Abhorhade.
शिक्षण संचालक (उच्च् शिक्षण )
महाराष्ट्र राज्य् पुणे - १ यांचे करीता

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
30 DEC 2015
आवक क्रमांक: 26599
शाखा:- लेखा-2

062

महाराष्ट्र शासन

क्र. संकिर्ण २०१५/प्र.क्र. १७६/साशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
विस्तार इमारत, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२
दिनांक : २३ डिसेंबर, २०१५

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**विषय** :- शासनाच्या विविध विभागांकडून मागील १५ वर्षात झालेल्या खरेदीबाबतची चौकशी करण्याबाबत

संदर्भ :- शासनाचे समक्रमांकाचे दि.१६ नोव्हेंबर २०१५ चे पत्र व दि. ५ डिसेंबर, २०१५चे स्मरणपत्र

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रान्वये सन २००१ पासून १५ वर्षात दर करारावर केलेल्या खरेदीची सविस्तर माहिती विवरणपत्रात त्वरीत सादर करणेबाबबत कळविण्यात आले होते . तथापि माहिती अद्याप अप्राप्त आहे. सदर माहिती तात्काळ सादर करणेबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४/११/२०१५ रोजी झालेल्या बैठकीत निदेश दिले आहेत. (बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. ) तसेच सदर इतिवृत्तासोबतच्या अ, ब व क विवरण पत्रानुसारची माहितीही तात्काळ सादर करण्यात यावी.

(सु.हे.पाटणकर)
कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन

लेखा-2
30/12/15

30/12

17783
19/12/2015

६९२६
२२.१२.१५

17 DEC 2015

महाराष्ट्र शासन
क्रमांक- चौकशी-२०१५/प्र.क्र. १६९/उद्योग-४,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक ४ डिसेंबर, २०१५

विषय- शासनाच्या विविध विभागांकडून मागील १५ वर्षात झालेल्या खरेदीची चौकशी करणे बाबत..
मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त...

महोदय,

वरील विषयासंदर्भात मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समितीची आढावा बैठक दिनांक २४/११/२०१५ रोजी दुपारी ४.३० वाजता त्यांचे मंत्रालयातील दालन, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे. सदर इतिवृत्तातील निर्देशानुसार विहित कालावधीत कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,
(वै. भू. लटके)
उप सचिव (उद्योग)

प्रती,

१) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव (नियोजन) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
३) अपर मुख्य सचिव , वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव (कृषी व पणन), मंत्रालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
९) प्रधान सचिव (ग्राम विकास), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) प्रधान सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) सचिव (पदुम), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मस्त्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई
२१) सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२२) सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रतिलिपी-

१) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय्य सहायक, मंत्रालय, मुंबई

**मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २४/११/२०१५ रोजी दुपारी ४.३० वाजता आयोजित केलेली आढावा बैठक**

**विषय- शासनाच्या विविध विभागांकडून मागील १५ वर्षात झालेल्या खरेदीची चौकशी करणे बाबत..**

## बैठकीचे इतिवृत्त

शासनाच्या विविध विभागांकडून मागील १५ वर्षामध्ये झालेल्या खरेदीची चौकशी करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अपर मुख्य सचिव (वित्त) व प्रधान सचिव (उद्योग) अशी त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीची आढावा बैठक मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २४/११/२०१५ रोजी दुपारी ४.३० वाजता त्यांचे मंत्रालयातील दालन, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित अधिकाऱ्यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. उज्वल उके | प्रधान सचिव, (सामाजिक न्याय विभाग) |
| २ | श्री. विजय सदबिर सिंह | प्रधान सचिव (गृह) |
| ३ | श्री. मनुकुमार श्रीवास्तव | प्रधान सचिव (महसूल) |
| ४ | श्री. विजयकुमार | प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) |
| ५ | श्री. नंदकुमार | प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग |
| ६ | श्री. संजय कुमार | प्रधान सचिव (महिला व बालविकास विभाग) |
| ७ | श्री. महेश पाठक | सचिव, पदुम विभाग |
| ८ | श्री. संजय चहांदे | प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग |
| ९ | डॉ. प्र. तु. वाकोडे | सह संचालक, वैद्यकिय शिक्षण |
| १० | श्री. विकास खारगे | सचिव (वने) |
| ११ | श्री. कु. ना. शिंदे | उप सचिव (आदिवासी विकास विभाग) |

२. बैठकीमध्ये २२ विभागांपैकी १५ विभागांची माहिती प्राप्त झाली असून त्यापैकी ९ विभागांची माहिती "निरंक" आहे व ६ विभागांच्या प्राप्त झालेल्या माहितीची छाननी करण्यात येत आहे. उर्वरीत ७ विभागांकडून अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही, ही बाब मा. मुख्य सचिव यांना अवगत करण्यात आली. त्यानंतर संबंधित प्रशासकीय विभागांनी मागील १५ वर्षाच्या खरेदीसंदर्भात जी माहिती सादर केली त्यावर चर्चा करण्यात आली. चर्चेमध्ये असे निदर्शनास आले की, जी माहिती मागविण्यात आली ती सर्व माहिती प्राप्त झाली तरी शासकीय विभागांकडून एकुण किती रकमेची खरेदी झाली ही बाब स्पष्ट

होणार नाही. यास्तव एका वर्षात एका वस्तूची खरेदी दरकरारावर एका पेक्षा जास्त वेळा होऊन अशा खरेदीची किंमत रु. १० कोटी पेक्षा अधिक होत असल्यास त्याबाबतची माहिती संकलित करणे उचित होईल. माहिती व तंत्रज्ञान विभागाने प्रथम रु. ५० लाख त्यांनतर रु. १० लाख व आता रु. ३ लाखाच्या वरील खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत वेळोवेळी निर्णय घेतला आहे. त्यामुळे माहिती व तंत्रज्ञान विभागाने ज्या रकमेसाठी ई-निविदा राबविण्याचा निर्णय घेतला त्याच कालावधीत सदर रकमेपेक्षा अधिक खरेदी दराकरारावर संबंधित विभागाने केली असल्यास त्याची देखील माहिती घेणे उचित राहील. तसेच खरेदीची चौकशी करण्याचा उद्देश, खरेदी ही त्यावेळच्या बाजाभावाच्या दरानुसार झाली आहे किंवा कसे, खरेदी करतांना कायद्यान्वये /नियमान्वये घालून दिलेल्या खरेदीच्या प्रक्रियेचा तंतोतंत अवलंब केला आहे किंवा कसे, खरेदी करतांना वित्तीय संहितेचे पालन झालेले आहे किंवा कसे, इत्यादी बाबी तपासणे, हा आहे. त्यामुळे खरेदीदार विभागांनी मागील १५ वर्षातील खरेदीमध्ये काही तक्रारी, अनियमितता झाली असल्यास त्याबाबत उपस्थित झालेले लेखा परिच्छेद / आक्षेप व त्यावर विभागांनी केलेली कार्यवाही/दिलेले उत्तर याबाबतची माहितीही संकलीत करणे उचित होईल, असे चर्चेमध्ये ठरले. चर्चेअंती मा. मुख्य सचिव यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिले.

| अ.क्र. | बैठकीत घेतलेले निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा/ अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करण्याची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | उद्योग विभागाने त्यांच्या दिनांक २६/१०/२०१५ व मा. मुख्य सचिव यांच्या स्तरावरुन दिनांक १०/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये विहित नमुन्यात माहिती सादर करण्याचे संबंधित विभागांना कळविण्यात आले होते. त्यानुसार ज्या ७ विभागांनी माहिती सादर केली नाही, त्या विभागांनी त्यांची माहिती ८ दिवसात उद्योग विभागास सादर करावी. | १) वित्त विभाग<br>२) वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्य विभाग<br>३) गृह विभाग<br>४) उच्च व तंत्रशिक्षण विभाग<br>५) महसूल विभाग<br>६) ऊर्जा विभाग<br>७) आदिवासी विकास विभाग | ८ दिवस | |
| २ | सन २०००-२००१ ते २०१४-२०१५ या कालावधीत एका वर्षात एकाच वस्तूची खरेदी दरकरारावर एका पेक्षा जास्त वेळा होऊन अशा खरेदीची एकूण किंमत रु. १० कोटीपेक्षा जास्त होत | सर्व संबंधित विभाग | १५ दिवसात | |

विवरणपत्र "अ"

विभाग/अधिपत्याखालील विभाग-

| अ.क्र. | बाब | खरेदीची एकूण प्रकरणे | खरेदीची रक्कम | खरेदीच्या वस्तू | कोणत्या दर कराराच्या आधारे खरेदी केली | खरेदीस मान्यता देणारे प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दिनांक ६/८/२०१० ते दिनांक १६/१/२०१३ या कालावधीत एका वस्तूची एका वर्षात रु. ५० लाखापेक्षा जास्त रकमेची दरकरारावर करण्यात आलेल्या खरेदीचा तपशील | | | | | |
| २ | दिनांक १७/१/२०१३ ते दिनांक १८/१२/२०१४ या कालावधीत एका वस्तूची एका वर्षात रु. १० लाखापेक्षा जास्त रकमेची दरकरारावर करण्यात आलेल्या खरेदीचा तपशील | | | | | |
| ३ | दिनांक १९/१२/२०१४ ते ३१/३/२०१५ या कालावधीत एका वस्तूची एका वर्षात रु. ३ लाखापेक्षा जास्त रकमेची दरकरारावर करण्यात आलेल्या खरेदीचा तपशील | | | | | |

विवरणपत्र "ब"

**<u>सन २०००-२००१ ते २०१४-२०१५ या कालावधीतील खरेदीची माहिती.</u>**

| अ. क्र. | खरेदी चे वर्ष | एका वर्षात एकाच वस्तूची खरेदी दरकरारावर एका पेक्षा जास्त वेळा होऊन रु. १० कोटी पेक्षा जास्त खरेदी केली असल्यास खरेदीची रक्कम | प्रशासकीय मान्यता देणारे प्राधिकारी व मान्यतेचा दिनांक | खरेदीस मान्यता देणारे प्राधिकारी | खरेदीची तारीख | खरेदी च्या वस्तू | कोणत्या दरकरारा च्या आधारे खरेदी केली |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

विवरणपत्र "क"

**सन २०००-२००१ ते २०१४-२०१५ या कालावधीत करण्यात आलेल्या कोणत्याही खरेदीबाबत महालेखापाल कार्यालय, लेखाधिकारी/स्थानिक लेखाधिकारी इत्यादींनी उपस्थित केलेला लेखा आक्षेप व त्याबाबतची माहिती**

| अ. क्र. | खरेदीचे वर्ष | खरेदीची वस्तू | खरेदीची किंमत | खरेदी दरकरारावर झाली किंवा निविदेव्दारे | खरेदीबाबत महालेखापाल कार्यालयाने/ लेखाधिकारी/ स्थानिक लेखाधिकारी इत्यादींनी उपस्थित केलेला लेखापरीच्छेद/ आक्षेपाची प्रत व आक्षेपाचे स्वरुप | आक्षेपावर केलेली कार्यवाही/ दिलेले उत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |